# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. : २८१९ २८२८.

## ।। सामान्य प्रशासन विभाग।।

जा.क्र.मनपा/सा.प्र./५१५ /२०२१ - २२ दि. २५ / ११ /२०२१

प्रति,
सर्व जनमाहिती अधिकारी, (लेखा परिक्षण विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका

लेखा परिक्षण विभाग
आवक- 26
दिनांक- 25/11/2021

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम,2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :- 1. श्री. सोहेल मु. खान यांचा दि. 23/11/2021 रोजीचा माहितीचा अधिकार अर्ज.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, सदरच्या पत्राचा विषय हा आपल्या विभागाशी संबंधित माहिती अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम 6 (3) अन्वये संदर्भिय पत्र पुढील कार्यवाहीसाठी आपल्या विभागास वर्ग करण्यात येत आहे. संबंधितांस परस्पर माहीती देण्यात यावी तसेच त्यांची एक प्रत सामान्य प्रशासन विभागांकडे देण्यात यावी.

सोबत :- संदर्भिय पत्र जोडले आहे.

(सुनिल यादव)
सहा. आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव
श्री सोहेल मु. खान
e-mail- nationalrevealed@gmail.com

जोडपत्र--अ
(नियम--3)

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम--6--अन्वये माहिती मिळविण्यासाठी विनंती अर्ज.

प्रति,

शासकिय जन माहिती अधिकारी
आयुक्त कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प) -- 401101.

१२२
23/11/2021

10 रु. (Rs.10) दस रुपये TEN RUPEES

1) अर्जदाराचा संपूर्ण नाव :-- सोहेल मु. खान.

2) संपूर्ण पत्ता :-- 1/103, गौरव वुड्स फेस--1, महापौर निवास जवळ, कनकिया, मिरा रोड (पु)--401107. मोबाईल:--8286971461, e-mail:- nationalrevealed@gmail.com

3) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील / विषय / वर्णन / वर्गीकरण :--

1) माहितीचा अधिकार अधिनिमय 2005 कलम--4(1)(ख)--अन्वये महानगरपालिकेने जाहिर प्रसिध्द केलेल्या 17 मुद्यांची माहितीचा एक प्रत माहितीचा अधिकारांतर्गत अनुक्रमणिक पृष्ठांकन व साक्षांकित करून मिळावी.

2) ज्या विभागाने वरील नमूद विषयी अद्याप माहिती प्रसिध्द केलेली नाही त्या विभागाचे नावे, विभाग प्रमुखांची नावे, कार्यालयीन पत्ता व दुरध्वानी क्रमांकसह माहिती मिळावी.

3) ज्या विभागाने वरील नमूद विषयी अद्याप माहिती प्रसिध्द केलेले नाही त्या विभागाचे जबाबदार विभाग प्रमुख विरूध्द महानगरनालिकेने केलेल्या कार्यवाहीबाबत तपशीलवार प्रत:ची माहिती मिळावी.

4) कोणत्या कालावधीची संबंधात माहिती हवी असेल तो कालावधी :-- कार्यालयीन कालावधी पासून आज आखेर पर्यंत.

5) माहिती टपालाने हवी आहे कि व्यक्तिशः :-- प्रत्यक्ष येउन माहिती घेउन जाणार आहे.

6) अर्जदार दारिद्रय रेषे खालील आहे का? :-- नाही.

दिनांक:--23 / 11 / 2021
ठिकाण:--ठाणे

सोहेल मु. खान

लेखा परिक्षण विभाग
आवक:-
दिनांक:- 12/1/2022

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१६०/२०२१
दि.११/०१/२०२२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.सोहेल मु. खान, ................अपिलार्थी
१/१०३, गौरव वुड्स, फेस-१, महापौर निवास जवळ,
कनाकिया, मिरारोड (पूर्व), ४०११०७.

श्री.सुनिल यादव, ................प्रतिवाद
जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,
आस्थापना विभाग.

## -: विवेचन :-

श्री.सोहेल मु. खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, आस्थापना विभाग यांचेकडे खालील माहिती मिळणेस दि.०२/११/२०२१ रोजी माहिती अधिकार अन्वये अर्ज सादर केला.

१) दिग्विजय सुबराव चव्हाण यांची राज्य शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेत मुख्य लेखापरिक्षक या पदी नियुक्ती करण्यात आले होते. तरी सदरील बाबत वेळोवेळी पारित करण्यात आलेल्या नियुक्ती आदेशाची प्रतची माहिती मिळावी.
२) वरीलप्रमाणे त्यांचा ३ वर्षांचा कार्यकाल मई २०२१ रोजी पुर्ण झाल्यानंतर त्यांनी वेळोवेळी पारित केलेल्या आदेश किंवा निर्णय याबाबत तपशीलवार प्रतची माहिती मिळावी.
३) वरीलप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर त्यांनी सही केलेल्या प्रत्येकी नस्ती व त्याबाबत कार्यालयात उपलब्ध रजिस्टरसह प्रतची माहिती मिळावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, आस्थापना विभाग यांनी कोणत्याही स्वरुपातील माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२८/१२/२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, आस्थापना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.११/०१/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/१९९/२०२१ दि.२९/१२/२०२१ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, श्री.सुनिल यादव, जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, आस्थापना विभाग हे सुनावणीस अनुपस्थित असुन त्यांच्या वतीने श्रीम.लॉरेटा घाडगे, सहा.जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, आस्थापना विभाग व अपिलार्थी अर्जदार हे सुनावणीस उपस्थित आहेत.

<u>**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद**</u>:- दि.०२/११/२०२१ रोजीच्या अर्जानुसार मी प्रत्यक्ष कार्यालयात वेळोवेळी चौकशी करुन मला आज अखेरपर्यंत कोणत्याही स्वरुपातील माहिती अप्राप्त आहे किंवा माहिती केव्हा उपलब्ध होईल याबाबतही आम्हास स्पष्ट उत्तर देण्यात येत नाही.

<u>**सहा.जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, आस्थापना विभाग यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-**</u> अपिलार्थी अर्जदारास माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: <u>निर्णय</u> :-

१) अपिल मंजुर करण्यात येत आहे.
२) जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, आस्थापना विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास मुद्दा क्र. बाबतची माहिती १० दिवसांत विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.
३) मुद्दा क्र.२ व ३ बाबतची माहिती जनमाहिती अधिकारी तथा लेखापरीक्षा अधिकारी, लेखापरीक्षण विभाग यांनी अर्जदारास १५ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात यावी.
४) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(मारुती गायकवाड)
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.सोहेल मु. खान,
१/१०३, गौरव वुड्स, फेस-१, महापौर निवास जवळ,
कनाकिया, मिरारोड (पूर्व), ४०११०७.

२) जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त, आस्थापना विभाग.

३) जनमाहिती अधिकारी तथा लेखापरीक्षा अधिकारी, लेखापरीक्षण विभाग

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

(नियम—3)

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम—6—अन्वये माहिती मिळविण्यासाठी विनंती अर्ज.

प्रति,
शासकिय जन माहिती अधिकारी
आयुक्त कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प) — 401101.

993
02/11/2021

1) अर्जदाराचा संपूर्ण नाव :— सोहेल मु. खान.

2) संपूर्ण पत्ता :— 1/103, गौरव वुड्स फेस—1, महापौर निवास जवळ, कनकिया, मिरा रोड (पु)—401107. मोबाईल:—8286971461, e-mail:- nationalrevealed@gmail.com

3) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील/विषय/वर्णन/वर्गीकरण :—

1) दिग्विजय सुबराव चव्हाण यांची राज्य शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेत मुख्य लेखापरिक्षक या पदी नियुक्ती करण्यात आले होते. तरी सदरील बाबत वेळोवेळी पारित करण्यात आलेल्या नियुक्ती आदेशाची प्रत:ची माहिती मिळावी.

2) वरील प्रमाणे त्यांचा 3 वर्षाचा कार्यकाल मई 2021 रोजी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी वेळोवेळी पारित केलेल्या आदेश किंवा निर्णय याबाबत तपशीलवार प्रत:ची माहिती मिळावी.

3) वरील प्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर त्यांनी सही केलेल्या प्रत्येकी नस्ती व त्याबाबत कार्यालयात उपलब्ध रजिस्टरसह प्रत:ची माहिती मिळावी.

4) कोणत्या कालावधीची संबंधात माहिती हवी असेल तो कालावधी :— कार्यालयीन कालावधी पासून आज आखेर पर्यंत.

5) माहिती टपालाने हवी आहे कि व्यक्तिशः :— प्रत्यक्ष येउन माहिती घेउन जाणार आहे.

6) अर्जदार दारिद्रय रेषे खालील आहे का? :— नाही.

दिनांक:—02/11/2021
ठिकाण:—ठाणे

सोहेल मु. खान